**पंतप्रधानांची 'हिरोज एकर' स्मारकाला भेट देऊन नामिबियाचे संस्थापकीय जनक आणि पहिले राष्ट्राध्यक्ष डॉ. सॅम नुजोमा यांना आदरांजली (09 जुलै 2025)**

09 जुलै 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'हिरोज एकर' स्मारकाला भेट देऊन, नामिबियाचे संस्थापकीय जनक आणि पहिले राष्ट्राध्यक्ष डॉ. सॅम नुजोमा यांना आदरांजली वाहिली.

2. डॉ. सॅम नुजोमा हे नामिबियाच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी आपले आयुष्य समर्पित करणारे दूरदर्शी नेते होते, अशा शब्दांत पंतप्रधानांनी त्यांचे स्मरण केले. स्वतंत्र नामिबियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून, डॉ. नुजोमा यांनी देशाच्या जडणघडणीत  प्रेरणादायी योगदान दिले. त्यांचा वारसा जगभरातील लोकांना आजही प्रेरित करत आहे.

3.  डॉ. सॅम नुजोमा हे भारताचे एक थोर मित्र होते. 1986 मध्ये नवी दिल्ली येथे नामिबियाच्या (त्यावेळचे SWAPO) पहिल्या राजदूत कार्यालयाच्या स्थापनेच्या वेळची त्यांच्या सन्माननीय उपस्थितीची आठवण भारतीय नागरिक कायमच प्रेमाने जपतील.

**विंडहोक**

**09 जुलै 2025**